**ठळक बातम्या**

- भारतात खेळ हे कायमच राष्ट्रीय एकात्मतेचं एक सामर्थ्यशाली माध्यम असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- त्रिनिनाद इथले भारतीय वंशाचे नागरिक आता ओवरसीज सिटीजन ऑफ इंडिया कार्डसाठी पात्र ठरतील, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची घोषणा

- राज्यातल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बोगस पदभरती प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्याची शालेय शिक्षण राज्य मंत्री पंकज भोयर यांची विधान परिषदेत माहिती

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यां ंच्या हस्ते पुण्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण

**आणि**

- वाशीम जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातात ४ जण ठार

**<><><><>**

खेळामुळे शिस्त, दृढनिश्चय आणि सांघिक भावना वाढते, खेळात लोक, विविध प्रदेश आणि देशांना जोडण्याची अद्वितीय शक्ती असते असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी म्हटलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं ड्युरँड चषक २०२५ या फुटबॉल स्पर्धेच्या चषकांचं अनावरण झालं. त्यावेळी राष्ट्रपतींनी उपस्थितांना संबोधितही केलं. भारतात खेळ हे कायमच राष्ट्रीय एकात्मतेचं एक सामर्थ्यशाली माध्यम राहिलं असल्याचं त्या म्हणाल्या.

फुटबॉल हा रणनीती, सहनशीलता आणि परस्पर सामाईक ध्येयासाठी सांघिक भावनेचं दर्शन घडवणारा खेळ असल्याचं त्या म्हणाल्या. ड्युरँड चषकासारख्या स्पर्धांमुळे खेळ भावना वाढण्यासोबतच, नव्या खेळाडूंच्या जडणघडणीसाठी व्यासपीठही उपलब्ध होतं असं त्या म्हणाल्या. सशस्त्र दलं ही स्पर्धा टिकून ठेवत तिचा वारसा पुढे नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

भारत हा जगभरातला तिसऱ्या क्रमांकाचा स्टार्टअप हब असल्याचं गौरवोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज पोर्ट ऑफ स्पेन इथं काढले. त्रिनिदाद आणि टोबॅगोमधील भारतीय समुदायाला संबोधित करताना ते बोलत होते. तत्पूर्वी विमानतळावर त्यांचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. त्रिनिदाद आणि टोबॅगोमधल्या भारतीय समुदायाचा प्रवास धैर्याचा असून आपले पूर्वज भारतीय संस्कृतीचे वाहक आहेत असंही ते म्हणाले. त्रिनिनाद इथले भारतीय वंशाचे नागरिक आता ओवरसीज सिटीजन ऑफ इंडिया कार्ड साठी पात्र ठरतील अशी घोषणाही त्यांनी केली.

- **होल्ड बाईट - प्रधानमंत्री -**

या कार्डामुळे भारतीय वंशाच्या नागरिकांना भारतात राहण्यास आणि काम करण्यास कोणतीही अडचण येणार नाही, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. कॅरेबियन द्विपसमूहात सर्वप्रथम आर्थिक व्यवहारात यूपीआय प्रणालीचा वापर केल्याबद्दल मोदी यांनी त्रिनिनाद आणि टोबॅगोचं कौतुक केलं आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पाच देशांच्या दौऱ्याच्या पुढच्या टप्प्यात अर्जेंटिनाला जात आहेत. प्रधानमंत्री अर्जेंटिनाच्या राष्ट्रपती जेवियर मिली यांच्या आमंत्रणावर अर्जेंटिनाला भेट देत आहेत. ५७ वर्षांनंतर भारतीय प्रधानमंत्र्यांची अर्जेंटिनाला ही पहिलीच भेट आहे. या भेटीत दोन्ही देशांमधल्या सहयोग आणि भागीदारी वाढवण्याच्या उपायांवर चर्चा होईल. दोन्ही राष्ट्रांत चालू सहकार्य आणि सामायिक भागीदारीवर चर्चा होणार असून आर्थिक भागीदारी, खाण, ऊर्जा सुरक्षा आणि आण्विक ऊर्जा यांचा शांत वापर या क्षेत्रांमध्ये करार करण्यात येतील. अर्जेंटिना लॅटिन अमेरिकेत भारतासाठी एक प्रमुख आर्थिक भागीदार आणि जी20 मध्ये सहकारी आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे. समाजासाठी स्वामी विवेकानंद यांचे विचार आणि दृष्टीकोन आजही मार्गदर्शक असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं म्हटलं आहे. स्वामी विवेकानंदांनी देशाचा इतिहास आणि सांस्कृतिक परंपरेप्रति अभिमान आणि

आत्मविश्वासाची भावना जागृत केली. ते सेवा आणि करुणेच्या मार्गावर चालत असल्याचं प्रधानमंत्री आपल्या संदेशात म्हणाले.

**<><><><>**

तुकडेबंदी कायद्याची पायमल्ली करून, सरकारी रक्कम जमा न करता जमिनींच्या परवानग्या दिल्याप्रकरणी नाशिकमधल्या संबंधित उपविभागीय अधिकाऱ्याला निलंबित केलं जाईल, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली. याबाबतचा प्रश्न गोपीचंद पडळकर यांनी उपस्थित केला होता. विधिमंडळाचं चालू पावसाळी अधिवेशन संपण्यापूर्वी या प्रकरणाशी संबंधित आठ नोंदणी अधिकाऱ्यांची चौकशी केली जाईल, आणि दोषींविरोधात फोजदारी कारवाई केली जाईल असंही त्यांनी सांगितलं.

मुंबईतून गुजरातकडे जाणाऱ्या रस्त्यांवरच्या कांदळवनाचं नुकसान करणाऱ्या डेब्रिज वाहतूक करणाऱ्यांवर सीसीटीव्ही कॅमेरानं लक्ष ठेवून कारवाई केली जाईल अशी ग्वाही वनमंत्री गणेश नाईक यांनी दिली. गुजरात ते गोवा या किनाऱ्यालगत लोकोपयोगी कामं कांदळवनांमुळे रखडत असल्याच्या मुद्यावर सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करणार असल्याचंही त्यांनी सभागृहाला सांगितलं.

सभागृहात काल शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काल चर्चा सुरू असताना, पीठासन अधिकाऱ्यांनी अनुपस्थित सदस्यांबद्दल कारणं माहिती करून न घेता परस्पर अनुचित आणि राजकीय वक्तव्य केल्याची तक्रार विजय वडेट्टीवार, भास्कर जाधव आणि नाना पटोले यांनी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे केली. याबद्दल आपल्या आपल्या दालनात बैठक घेऊन योग्य कार्यवाही करण्याचं आश्वासन अध्यक्षांनी दिलं.

सरन्यायाधीश पदी न्यायमूर्ती भूषण गवई यांची नियुक्ती झाल्याबद्दल येत्या आठ तारखेला मुंबईत विधानभवनात सत्कार केला जाणार असल्याची तसंच, यावेळी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई संविधान या विषयावर संबोधित करणार असल्याची माहितीही अध्यक्षांनी सभागृहाला दिली.

**<><><><>**

राज्यातल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा बोगस पदभरती प्रकरणी, संबंधित विभाग आणि शिक्षणसंस्थांच्या अधिकारी, कर्मचारी आणि  पदाधिकाऱ्यांविरोधात फौजदारी

गुन्हा दाखल करायचे आदेश दिले असल्याची माहिती शालेय शिक्षण राज्य मंत्री पंकज भोयर यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सभागृहाला दिली. आमदार सुधाकर अडबाले यांनी याबाबतचा प्रश्न विचारला होता. या प्रकरणी एका महिन्याच्या आत राज्यस्तरीय चौकशी समिती स्थापन केली जाणार असल्याचंही भोयर यांनी सभागृहाला सांगितलं.

<><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पुण्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या त्रिशक्ती प्रवेशद्वारावर थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण केलं. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री दे◌ेवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अमित शहा यांच्या हस्ते शिल्पकार विपुल खटावकर आणि स्थापत्यकार अभिषेक यांचा सत्कार करण्यात आला.

पेशवा बाजीराव स्मारकची योग्य जागा ही राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी हीच आहे कारण जिथून तीनही सेनांचे जवान भविष्याचे प्रशिक्षण घेतात ते बाजीराव यांच्या पुतळ्याकडून प्रेरणा घेतील आणि कित्येक वर्षांपर्यंत भारताच्या सीमांना कोणी हात लावण्याचं साहस करणार नाही, असा विश्वास शहा यांनी यावेळी व्यक्त केला.

<><><><>

वाशीम जिल्ह्यात जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर काल नागपूर कॉरिडॉरवर वाहन चालकाचं नियंत्रण सुटल्यानं झालेल्या अपघातात ४ जण ठार तर १ जण जखमी झाला. या अपघातात तिघंजण जागीच ठार झाले तर एकाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. अपघातग्रस्त वाहन नागपूर जिल्ह्यातील उमरेड इथले आहे.

<><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या महिलांच्या टी20 क्रिकेट मालिकेतला तिसरा सामना आज केनिंग्टनमध्ये होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार सामन्याला रात्री ११ वाजून ५ मिनिटांनी सुरुवात होईल. पहिल्या दोन सामन्यात भारतानं विजय मिळवून २-० अशी आघाडी घेतली आहे.

<><><>

अँडरसन-तेंडुलकर करंडकासाठी इंग्लंडमध्ये एजबस्टन इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल यानं द्विशतक झळकावून इतिहास रचला. इंग्लंडमधील कसोटी सामन्यात द्विशतक करणारा तो पहिला भारतीय तसंच पहिला आशियाई कर्णधार ठरला आहे. गिलनं केलेल्या दमदार २६९ धावांमुळे भारताला ५८७ एवढी भक्कम धावसंख्या उभारता आली; त्यामुळे पहिल्या डावात संघाची स्थिती भक्कम झाली आहे. काल दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा यजमान इंग्लंडच्या संघाच्या तीन गडी बाद ७७ या धावा झाल्या.

<><><>

कॅनडा खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किदांबी श्रीकांतने पुरुष एकेरीत चीनच्या तैपैच्या वांग पो-वेईवर विजय मिळवला. त्याचा सामना उद्या तैवानच्या तियेन-चेन बरोबर होणार आहे. शंकर सुभ्रमण्यमनं तैवानच्या ह्वांग यु-काईचा पराभव करून अंतिम आठमध्ये प्रवेश केला आहे. महिला एकेरीत श्रियांशी वलिशेट्टी चा सामना आज संध्याकाळी डेन्मार्कच्या अमलिये शुल्झ सोबत होणार आहे.

<><><>

क्रोएशियात सुरु असलेल्या ग्रँड चेस टूर स्पर्धेत जागतिक विजेता डी. गुकेशनं अव्वल मानांकन असलेल्या मॅग्नस कार्लसनचा सहाव्या फेरीत पराभव केला.

<><><>

प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत २९व्या आंतरराष्ट्रीय प्रसारण आणि माध्यम तंत्रज्ञान परिषद- BES EXPO २०२५चं उद्घाटन करण्यात आलं. गेल्या दहा वर्षात देशातल्या डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये अनेक पटींनी वाढ झाली असल्याचं सेहगल यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

<><><>

ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने आज झारखंडमध्ये हजारीबाग आणि रांचीमधल्या आठ ठिकाणांवर छापे टाकले. झारखंडचे माजी मंत्री योगेंद्र साओ आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरुद्ध करण्यात आलेल्या आर्थिक गुन्ह्यांच्या आरोपांच्या चौकशीसाठी हे

छापे टाकण्यात आले आहेत. खंडणी, बेकायदेशीर वाळू उत्खनन, जमीन हस्तांतरण अशा विविध प्रकारच्या आरोपांचा त्यात समावेश आहे.

**<><><><>**

आपली सर्व उद्दिष्ट्ये साध्य होईपर्यंत युक्रेनविरोधातली लष्करी कारवाई सुरूच ठेवणार असल्याचं रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी म्हटलं आहे. पुतिन आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी काल झालेल्या दूरध्वनीवर चर्चा झाली. या चर्चेत त्यांनी ही बाब स्पष्ट केल्याची माहिती रशियाचे परराष्ट्र धोरण सल्लागार युरी उषाकोव्ह यांनी दिली. हा संघर्ष लवकरात लवकर संपवावा हे ट्रम्प यांचं आवाहन पुतीन यांनी फेटाळलं असल्याचं त्यांनी सांगितलं. मात्र युक्रेनसोबत राजकीय संवादाच्या माध्यमातून या संघर्षावर तोडगा काढायची रशियाची तयारी असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

**//<><><><>//**